




दैनिक **आरंभपर्व**

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ०६७ ● पुणे ● सोमवार, दि. २० जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




क्रेसेन्डो २५ ला विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद 2



१२.५० लाख शेतकऱ्यांसाठी खुशखबर ! 3

## ठळक बातम्या

### तिघांच्या कुटुंबाने घेतला गळफास

**पिंपरी (पुणे) : (आरंभ पर्व):** सावकाराच्या त्रासाला कंटाळून एकाच कुटुंबातील तिघांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यात मायलेकाचा मृत्यू झाला, तर पती बचावला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. चिखलीतील सोनवणे वस्तीत शुक्रवारी रात्री ही धक्कादायक घटना उघडकीस आली. शुभांगी हांडे (वय ३६) आणि धनराज (९) अशी मृत मायलेकाची नावे आहेत. पती वैभव हांडे (४५) यांनी फिर्याद दिली. त्यावरून संतोष कदम, संशयित महिला संतोष पवार आणि जावेद खान यांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तिघांनी झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. नंतर छताच्या पंख्याला गळफास लावला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक विठ्ठल साळुंके यांच्या दिलेल्या माहितीनुसार, वैभव हांडे यांचे औषधी दुकान असून, त्यांनी २०१६ मध्ये संतोष कदम याच्याकडून सहा लाख रुपये, संशयित महिलेकडून दोन लाख, जावेद खान यांच्याकडून चार लाख, तर संतोष पवारकडून साडेसात लाख रुपये १० टक्के व्याजाने घेतले होते.

### बोर्ड प्रवेशपत्रे अखेर मागे

**पुणे (आरंभ पर्व) :** दहावी, बारावी परीक्षांच्या प्रवेशपत्रावर विद्यार्थ्यांच्या जात प्रवर्गाचा उल्लेख केल्याने समाजातील सर्वच स्तरातून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्यानंतर शनिवारी मंडळाने सपशेल माघार घेत ही प्रवेशपत्रेच रद्द केली. जातीचा उल्लेख काढून नवीन प्रवेशपत्रे दिली जाणार आहेत. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध करून दिले असून, त्यावर विभागीय मंडळाचे नाव, कनिष्ठ महाविद्यालय, विद्यार्थ्याचे नाव, जन्मतारीख, लिंग, आईचे नाव, विद्याशाखा, अपंगत्व, बैठक क्रमांक, केंद्र क्रमांक, केंद्राचे नाव यासह यंदा प्रथमच जात प्रवर्ग नमूद केला होता. दहावी, बारावीच्या प्रवेशपत्रावर जात प्रवर्गाचा उल्लेख, ही अयोग्य आणि अनावश्यक बाब असल्याचा आक्षेप अनेकांनी नोंदविला. समाजमाध्यमांमधूनही यासंदर्भात टीकेची झोड उठल्यानंतर ही प्रवेशपत्रे रद्द करण्यात आली.

### हॉकर झोनसाठी अर्थसंकल्पात दहा कोटी रुपयांची तरतूद

**पिंपरी (आरंभ पर्व) :** महापालिका शहरातील पथ विक्रेत्यांसाठी विशेष आर्थिक नियोजन तसेच हॉकर्स झोन निर्मितीसाठी दहा कोटींपेक्षा अधिक रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात येईल, अशी ग्वाही महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघाच्या शिष्टमंडळाला गुरुवारी (दि. १६) महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघ, कष्टकरी संघर्ष महासंघाच्या शिष्टमंडळाने गुरुवारी आयुक्त शेखर सिंह तसेच उपायुक्त मुकेश कोळप यांची भेट घेऊन फेरीवाला योजनाबाबत चर्चा केली. यावेळी कामगार नेते काशीनाथ नखाते, नवनियुक्त शहर विक्रेता समिती सदस्य किरण साडेकर, राजू बिराजदार, किसन भोसले, सलीम डांगे, प्रल्हाद कांबळे, अलका रोकडे यांच्यासह महासंघाच्या महिलाध्यक्षा वृषाली पाटणे, कार्याध्यक्ष इरफान चौधरी आदी उपस्थित होते.

# भारतीय महिला संघ ठरला जगज्जेता!

## बीडच्या प्रियंकाच्या नेतृत्वात पहिल्या वर्ल्ड कपवर कोरलं नाव



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

पहिला वहिला खो-खो वर्ल्ड कप नुकताच दिल्लीमध्ये पार पडला. या स्पर्धेत भारताच्या महिला संघाने रविवारी (१९ जानेवारी) विजेतेपदाला गवसणी घातली आहे. भारतीय महिला संघाने अंतिम सामन्यात नेपाळला ७८-४० फरकाने पराभवाचा धक्का दिला. यासह भारतीय संघाने पहिलाच वर्ल्ड कप आपल्या नावावर केला. मुळची महाराष्ट्रातील बीडची असलेल्या प्रियंका इंगळेच्या नेतृत्वात खेळणाऱ्या भारतीय महिला संघाने सुरुवातीपासूनच या सामन्यात वर्चस्व ठेवले होत. त्यांनी नेपाळला कोणत्याही क्षणी पुनरागमनाची संधी दिली नाही. अंतिम सामन्यात भारतीय संघाचा चपळ खेळ पुन्हा दिसून आला. महिला संघाने सांघिक कामगिरी आणि अचूक रणनीतीमुळे नेपाळला पराभवाचा धक्का दिला. चपळाई, अचूकता आणि जिद्दीच्या जोरावर भारतीय खेळाडूंनी या सामन्यात एकतर्फी वर्चस्व सिद्ध केलं होतं. भारताच्या या विजयाचे देशभरातून कौतुक होत आहे. तिसऱ्या टर्नमध्ये भारताने नेपाळची पहिली तुकडी १.४२ मिनिटात बाद केली. त्यानंतर दुसरी तुकडी ३३ सेकंदात, तिसरी तुकटी १.७ मिनिटात बाद केली.

## रागात तरुणानं भयंकर कट रचला अन् शिक्षकाचा...

**बिहार (दै. आरंभ पर्व)**

बिहारमधील नालंदा येथे शाळेतून हाकलून दिल्याने संतापलेल्या विद्यार्थ्याने आपल्याच मुख्याध्यापकावर गोळी झाडली. ही धक्कादायक घटना जिल्ह्यातील दीपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. NH 20 वर असलेल्या माँ भवानी लाईन हॉटेलमध्ये एका माजी विद्यार्थ्याने प्राचार्यांवर गोळ्या झाडल्या. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी संध्याकाळी सेंट जोसेफ शाळेचे प्राचार्य जोसेफ टीटी हे त्यांच्या शाळेतील मुलांसोबत जमशेदपूरच्या कार्यक्रमाला जात होते. लाईन हॉटेलमध्ये चहा घेण्यासाठी ते खाली आले असता स्विफ्ट कारमधून पाच गुन्हेगार आले आणि त्यांनी मुख्याध्यापकांशी बाचाबाची केली. मोठ्या वादानंतर एका तरुणाने कमरेतून पिस्तुल काढून मुख्याध्यापकावर गोळी झाडली. गोळीबार केल्यानंतर सर्व गुन्हेगार घटनास्थळावरून पळून गेले. या घटनेत जखमी झालेल्या मुख्याध्यापकाला खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. प्राचार्य सध्या जीवन आणि मृत्यू यांच्यातील लढाई लढत आहेत. या घटनेनंतर नालंदाचे एसपी भरत सोनी यांनी तत्काळ कारवाई करत मोबाईल ट्रेस केला. बिहार पोलीस स्टेशनच्या रेल्वे गुमतीजवळ पोलिसांनी 2 हल्लेखोरांना पकडले. ज्यामध्ये अरफीन कुदरत उर्फ साजी (25 वर्षे) आणि सय्यद नजफ जाफर अहमद उर्फ अयान (19 वर्षे) यांचा समावेश आहे. पकडलेल्या हल्लेखोराची चौकशी केली असता अनेक धक्कादायक खुलासे झाले. या संपूर्ण घटनेचा मास्टरमाइंड १९ वर्षीय मोहम्मद रायन होता. रायन हा सेंट जोसेफ शाळेचा विद्यार्थी राहिला आहे. एसपींसमोर प्राचार्यांवर हल्ला करताना पकडलेल्या हल्लेखोराने केलेल्या खुलाशांवरून हा हल्ला बदला घेण्यासाठी केल्याचे उघड झाले आहे.


# ११ कोटींचा सोनेरी रंगाचा घोडा

## एक कोटीची कंधारी गाय अन् मुऱ्हा रेडा!

**बारामती (दै. आरंभ पर्व)**

बारामती येथील ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने आयोजित कृषक प्रदर्शनात सोनेरी रंगाचा घोडा, दीड फूट उंचीची बन्नूर मेंढी, १,५०० किलो वजनाचा कमांडो नावाचा रेडा, ३ फुटांची पोंगनूर गाय आकर्षण ठरले.

हैदराबादच्या नवाब हसन बिंद्रिप यांच्या सोनेरी रंगाच्या घोड्याने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. हा घोडा पाहण्यासाठी शेतकऱ्यांची आणि अश्वप्रेमींची गर्दी झाली होती. विशेष म्हणजे, या घोड्याची मालेगावच्या यात्रेत ११ कोटींची किंमत सांगितली होती. त्यामुळे प्रदर्शनातील हा ११ कोटी रुपये किमतीचा घोडा चर्चेत आहे.



विशेष म्हणजे, मारवाडी पठड्याच्या हा घोडा असून, तो देशात एकमेव असल्याचा दावा नवाब यांनी केला आहे. हा घोडा ८ वर्षांचा आहे, तो त्यांनी पुष्करच्या यात्रेतून खरेदी केला आहे. त्या घोड्याचा खुराक ऋतुमानानुसार वेगवेगळा असून, त्याचे डोळे आणि शरीर यांचा रंग एकसारखा असल्याने हा घोडा अतिशय आकर्षित करत आहे. हा घोडा पाण्यासाठी गर्दी होत होती.

पिंपरी सांडसचे अमित शिंदे यांचा १,५०० किलो वजनाचा १ कोटी रुपये किमतीचा कमांडो नावाचा रेडाही भाव खाऊन गेला. या रेड्याबरोबर सेल्फी काढण्यासाठी गर्दी झाली होती. दररोज या रेड्याला ५० किलो चारा, सरकी, खोबरे पेंड, एक किलो गावरान तूप आणि १० लिटर दुधाचा आहार आहे, तसेच नांदेडच्या लोहा तालुक्यातील विश्वनाथ जाधव यांची १ कोटी रुपये किमतीची रामा आणि रावण नावाची लाल कंधारी जातीचे बैल शेतकऱ्यांच्या कौतुकाचा विषय ठरली, कर्नाटकच्या बन्नूर येथील दुर्मीळ दीड फूट उंचीची बन्नूर जातीची मेंढी प्रथमच पाहावयास मिळाली. ही मेंढी चेहरा वाचणारी आहे. तिला माणसांचे भाव समजतात, असे याबाबत लिंगा राजू यांनी सांगितले . ३ फुटी पोंगनूर गाय पालनाचा बारामतीत प्रयोग यशस्वी करणारे किशोर हिंगणे यांनी सांगितले की, मूळ आंध्राची ही गाय आहे.


दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR

आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com



Call Now ७२७६३१४१४२



दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

वार्ताहर नेमणे आहे

पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.

सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व

**पुणे जिल्हा**
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर

**पुणे शहर**
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा

इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com

**वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा**
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक



(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)

दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272



# बोगद्यातील किरण



विकासप्रकल्पांचे काश्मीरमधील अनेकपदरी महत्त्व ओळखून अडथळ्यांना तोंड देत ही प्रक्रिया चालू ठेवावी लागेल, तेथील राजकीय घडी पुनःस्थापित करण्यालाही प्राधान्य दिले पाहिजे.

जम्मू-काश्मीरमधून येणाऱ्या बातम्या या दहशतवादी कृत्यांच्या, हिंसाचाराच्या, बंद, मोर्चे वगैरे घटनांच्याच असणार असे समीकरणच जणू गेल्या दशकात तयार झाले. प्रसारमाध्यमांमधून काश्मीरचे आपल्यापर्यंत जे चित्र येते, ते याच प्रकारच्या बातम्या, व्हिडिओ, रील आदी बाबींनी व्यापलेले असल्यामुळे तो समज आणखी घट्ट होतो.

अशा घटना तिथे घडतात, हे वास्तव असले तरी जम्मू-काश्मीर म्हणजे फक्त तेवढेच नाही. तिथेही सर्वसामान्य लोक राहतात. त्यांच्या काही भौतिक आकांक्षा आहेत. तिथला तरुणवर्ग रोजगारसंधींकडे डोळे लावून बसला आहे. श्रीनगर ते सोनमर्ग या मार्गावरील 'झेड' आकाराच्या बोगद्याचे बांधकाम पूर्ण होण्याच्या घटनेचे महत्त्व यासंदर्भात तर आहेच; परंतु त्याचबरोबर त्याला इतरही पैलू आहेत.

या बोगद्याचे उद्‌घाटन सोमवारी केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "काश्मीर खोऱ्यात विकासाची नवी गाथा लिहिली जात आहे," असे जे म्हटले, त्यामागे पायाभूत विकासप्रकल्पांशी संबंधित सर्व परिमाणे त्यांना अभिप्रेत होती, हे उघड आहे.

नवे रस्ते, पूल, बोगदे अशा प्रकारची कामे झाल्यानंतर प्रवाशांची मोठी सोय होते, त्याचप्रमाणे जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीच्या खर्चात बचत होते. जम्मू आणि काश्मीरमध्ये उद्योग-व्यवसायांना चालना देणे, पर्यटन व्यवसायाला अनुकूल अशा व्यवस्था तयार होणे याची गरज आहे. या बोगद्यामुळे श्रीनगरहून सोनमर्गकडे जाताना भूस्खलन होणाऱ्या भागाला टाळून पुढे जाता येईल.

व्यूहनीतीच्या दृष्टीने महत्त्वाच्या लडाखकडे जाण्याचा मार्ग खुला होणार आहे. एरवी पावसाळ्यात वाहतूक ठप्प राहते. हिमस्खलन, भूस्खलन अशा समस्या भेडसावतात. आता श्रीनगर ते लेह या प्रवासाचा कालावधी कमी होईल. सोनमर्गमधील पर्यटनव्यवसायाला होणारा लाभही अनेकपदरी आहे.

या प्रकल्पाच्या बरोबरीनेच १४ किमी लांबीच्या जोझिला बोगद्याचे कामही चालू आहे. त्यामुळे श्रीनगर ते लेह-लडाखदरम्यानच्या प्रवासात साडेतीन तासांची बचत होणार आहे. जम्मू आणि श्रीनगरदरम्यान ५० हजार कोटी रुपये खर्चून जम्मू-उधमपूर-श्रीनगर, जम्मू-अनंतनाग, सुरणकोट- शोपियाँ-बारामुल्ला-उरी, जम्मू-अखनूर-सुरणकोट-पूंछ या चार कॉरिडॉरच्या निर्मितीसह पायाभूत सुविधांची अनेक कामे हाती घेण्यात आली असून ती येत्या तीन-चार वर्षांमध्ये पूर्ण होणार आहेत. रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरीकरीत असलेला सक्रिय पाठपुरावा त्याला कारणीभूत आहे, याची नोंद घ्यायला हवी.

मात्र ही विकासगाथा लिहिणे हे वाटते तेवढे सोपे नाही. हे अवघडपण अर्थातच दुर्गम प्रदेश, वेगळी भूपृष्ठरचना यामुळे जाणवतेच. अशा प्रकल्पांमध्ये अभियांत्रिकी कौशल्य लागते आणि जोखीमही पत्करावी लागते. अर्थात साडेसहा किलोमीटर लांबीच्या या बोगद्याच्या २०१२ मध्ये सुरू झालेल्या कामात आलेले अडथळे केवळ तांत्रिक स्वरूपाचेच होते, असे नाही.

इथल्या विकासप्रक्रियेलाच खीळ घालण्यात काही शक्तींचे हितसंबंध गुंतलेले आहेत. पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादी संघटना हा त्यापैकी एक मुख्य भाग. काश्मिरी जनतेवर प्रचंड अन्याय होत असून भारत सरकारची दडपशाही काश्मीर खोऱ्यात चालू असल्याचा प्रचार सतत होत असतो.

अशा प्रकारची विकासकामे त्या प्रचाराला छेद देतात, त्यामुळेच ती होऊ नयेत, यासाठी आटापिटा केला जातो. असे 'जोडणारे' प्रकल्प पूर्ण झाले की 'तोडणारे' गट अस्वस्थ होणार यात शंका नाही. त्यामुळेच हे काम सुरू असताना दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात सात कामगार मृत्युमुखी पडले. खरे तर हेदेखील देशासाठी केले गेलेले हौतात्म्यच आहे. विरोधाला झुगारून ही प्रक्रिया पुढे न्यायला हवी आणि त्याला सुरळित राजकीय प्रक्रियेचीही जोड द्यायला हवी. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी बोगद्याच्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केलेली अपेक्षा नेमकी याच स्वरूपाची होती. जम्मू-काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा दिला जावा, या मागणीचा त्यांनी पुनरुच्चार केला.

३७० कलमाचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला नाही, हे अर्थपूर्ण आहे. आता पंतप्रधानांनी आश्वासन दिल्याप्रमाणे याबाबतीत पावले उचलायला हवीत. आणखी एक मुद्दा विचारात घ्यायला हवा. विकासकामांच्या वेगाचे कौतुक करताना अनेकदा पर्यावरणीय घटक आणि त्याविषयीचा दृष्टिकोन डावलला जाण्याचा धोका असतो. भारताने तो टाळून याहीबाबतीत आपले वैशिष्ट्य दाखवून द्यायला हवे. लोकांच्या आकांक्षांना उचित राजकीय व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि सामाजिकदृष्ट्या लोकांना जोडणारे वातावरण निर्माण करणे या मुख्य आव्हानावरील लक्ष कधीही ढळता कामा नये.

प्रदेशांना जोडणाऱ्या 'अभियांत्रिकी' इतकीच मने जोडणारी 'अभियांत्रिकी' काश्मीर खोऱ्यातील गेल्या दशकभरातील अंधार दूर करण्यास कारणीभूत ठरेल. श्रीनगर ते सोनमर्ग मार्गावरील बोगद्याच्या यशस्वी कामामुळे त्या आशेला थोडी बळकटी मिळाली आहे. हे नंदनवन सुंदर आहेच; ते स्थिर, शांत, समृद्धही व्हायला हवे.



## सचिन सुंबे यांना आदर्श पत्रकार पुरस्कार

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

उरुळी कांचन येथे अखिल भारतीय राज्य मराठी परिषद व पोलीस मित्र संघटना महाराष्ट्र राज्य व कलागोविंद शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या वतीने राज्य स्तरीय काव्य संमेलन आयोजित करण्यात आले होते.यामध्ये सामाजिक,शैक्षणिक , राजकीय व पत्रकार क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावेळी पत्रकार सचिन सुंबे यांना आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.मागील अनेक वर्षांपासून पत्रकारितेच्या माध्यमातून समाजसेवेचे काम सचिन सुंबे हे करत आहेत व अनेक ठिकाणी होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले असुन मांजरी उपबाजारामधील शेतकऱ्यांची होणारी हेळसांड थांबविण्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांच्या बाजुने सविस्तर लिहून शेतकऱ्यांच्या मागे खंबीरपणे उभे आहेत .त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील व आरोग्य क्षेत्रातील काम उल्लेखनीय असुन आपल्या लेखणीतून त्यांनी अनेक प्रश्न तडीस नेले आहेत . या पुरस्कारामुळे पूर्व हवेलीतील अनेक भागातुन त्यांचे अभिनंदन होत आहे .

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे,प्रा. सुरेश वाळेकर,संमेलन अध्यक्ष सूर्यकांत नामुगडे,साहित्य परिषद राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे,क्रीडा अधिकारी माणिक देवकर,मा. जि. प सदस्य महादेव कांचन उपस्थित होते .यावेळी नितीन करडे ,भाऊसाहेब महाडिक यांना सुद्धा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# क्रेसेन्डो २५ ला विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इंटरनॅशनल स्कूल ऑफ बिझनेस अँड मीडियाचा प्रमुख सांस्कृतिक महोत्सव, क्रेसेन्डो, देशभरातील ७५ हून अधिक महाविद्यालयांना एकत्र आणतो आणि त्यांना गतिमान आंतर-महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सहभागी करून घेतो. क्रेसेन्डो'२५ ला विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. "सिल्व्हर स्पिरिट्स, रॉक द नाईट" या थीमसह, क्रेसेन्डो'२५ हा तीन दिवसांचा सांस्कृतिक कार्यक्रम होता ज्यामध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी पुणे, सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ मीडिया येथील आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांनी भाग घेतला. आणि कम्युनिकेशन, आयबीएस, एमआयटी डब्ल्यूपीयू, क्राइस्ट युनिव्हर्सिटी, एनआयसीएमएआर, ॲलार्ड युनिव्हर्सिटी, आयआयएसईआर, आयआयएफटी, एमआयटी, लेक्सिकॉन, आयएमईडी, पीडीईए,




सिंहगड इन्स्टिट्यूट, बीएमसीसी, एनआयबीएम आणि इतर अनेक ७५ हून अधिक आघाडीच्या विद्यापीठांनी सहभाग घेतला. १६ ते १८ जानेवारी २०२५ या कालावधीत विविध स्पर्धा आणि प्रात्यक्षिकांमध्ये, सहभागींनी त्यांचे अतुलनीय ज्ञान आणि अनुभव शेअर करणाऱ्या प्रख्यात उद्योग व्यावसायिकांच्या देखरेखीखाली त्यांच्या कल्पकतेचे प्रदर्शन केले आणि देशभरातील १००० हून अधिक सहभागींनी यात भाग घेतला.

१८ जानेवारी २०२५ रोजी आयएसबी अँड एम कॅम्पसमध्ये आयोजित आर्टिस्ट नाईटला पुण्यात ५५०० हून अधिक लोक उपस्थित होते. सिल्व्हर ज्युबिली स्टार शोमध्ये सुमधुर स्टारकास्ट, मिस्टर स्टेबिन बेन आणि करिष्माई सुश्री आस्था गिल यांचा समावेश होता. या शोने प्रेक्षकांना आयुष्यभराच्या आठवणी देऊन गेले.

डॉ. प्रमोद कुमार यांच्या सर्जनशील नेतृत्वाखाली सन 2000 मध्ये स्थापन झालेल्या, ISB&M या संस्थेने आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यावसायिक वातावरणात भरभराट झालेल्या व्यक्तींची निर्मिती करून त्यांच्या उत्कृष्टतेसाठी प्रतिष्ठा निर्माण केली आहे. पुण्यातील बिझनेस मॅनेजमेंट स्कूल्स ही एक उच्च शिक्षण देणारी प्रतिष्ठित संस्था आहे. 'इंटरनॅशनल स्कूल ऑफ बिझनेस अँड मीडिया' या संस्थेने आपल्या 25 व्या रौप्यमहोत्सव प्रसंगी क्रेसेंडो-25 या सांस्कृतिक उत्सवाचे यशस्वीरित्या आयोजन केलेले आहे. या ऐतिहासिक प्रसंगाने विद्यार्थ्यांमधील नेतृत्व, त्यांच्यातील नावीन्य आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी ISB&M च्या २५ वर्षांच्या इतिहासाचा आणि वाटचालीचा गौरव केला. व्यवस्थापन हे वर्गखोल्यांपुरते मर्यादित नाही; ते कृतीत भरभराट होते. सैद्धांतिक ज्ञान हा पाया बनवताना, खरे प्रभुत्व वास्तविक जगाच्या सरावातून येते. व्यवस्थापनाचे सार अंमलबजावणीमध्ये आहे. हे रणनीतींचे परिणामांमध्ये रूपांतर करणे, कल्पना आणि परिणामांमधील अंतर कमी करणे याबद्दल आहे. प्रभावी व्यवस्थापक दृष्टीचे वास्तवात रूपांतर करतात, हे सिद्ध करतात की यश केवळ नियोजनात नाही तर कार्यात आहे.



## बोपोडी येथे मोफत नेत्र तपासणी व नेत्र शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्याच्या माजी उपमहापौर सुनीता परशुराम वाडेकर मित्रपरिवार आणि रोटरी क्लब ऑफ पुना डाऊनटाऊन, एच व्ही देसाई नेत्र रुग्णालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व नेत्र शस्त्रक्रिया शिबिर आज बोपोडी येथे सम्यक विहार व विकास केंद्र या ठिकाणी संपन्न झाले.

या शिबिरात ६०० हून अधिक नागरिकांनी नेत्र तपासणी चा लाभ घेतला तसेच ५० हून अधिक नागरिकांनी शस्त्रक्रियेसाठी नोंदणी केली. या ठिकाणी मोफत चष्म्यांचे वाटपही करण्यात आले.

कार्यक्रम प्रसंगी पुण्याच्या माजी उपमहापौर सुनिता परशुराम वाडेकर, रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र संघटन सचिव परशुराम वाडेकर, रोट, री क्लब ऑफ पूना डाउनटाउन (३१३१) च्या डायरेक्टर डॉ. झिमरा इसराइल, अध्यक्ष प्रो. डॉ. अय्यर, डिस्ट्रिक्ट ऑफिसर परविन सडेकर, पल्लवी साबळे रिपब्लिकन पक्षाचे शिवाजीनगर विधानसभेचे अध्यक्ष अविनाश कदम, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# कृषीकन्यांकडून खरपुडी बुद्रुकमध्ये माती परीक्षण

**राजगुरुनगर : किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्नीत डॉ. डी. वाय. पाटील एज्यूकेशन ॲकडमी अंतर्गत पद्मभुषण वसंतदादा पाटील कृषी महाविद्यालय, आंबी, तळेगाव दाभाडे (ता. मावळ ) येथील कृषीकन्यांनी खरपुडी बुद्रुक (ता. खेड) येथे शेतकऱ्यांना ग्रामीण (कृषि) जागरुकता आणि कृषि औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत माती परिक्षणाचे प्रात्याक्षिक दाखविले.

पिकांच्या उत्पादन वाढीसाठी आवश्यक असते ते मातीचे आरोग्य, परंतु शेतजमीनिच्या आरोग्याकडे शेतकऱ्यांचे दुर्लक्ष होते. काळाच्या ओघात शेतीव्यवसायात आमूलाग्र बदल झाले, पण आजही या मूलभूत गोष्टींकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. शेतातील मातीच्या नमुन्यांचे भौतिक, रासायनिक, जैविक पृथक्करण करून त्यातील उपलब्ध अन्नद्रव्याचे प्रमाण तपासणे हे महत्वाचे असते. अशी माहीती यावेळी कृषीकन्या दिपाली डोळस, दिपाली डामसे, समृध्दी वैरागर, निकिता बिक्कड यांनी ग्रामस्थांना दिली.

यावेळी स्थानिक शेतकऱ्यांनी कृषीकन्यांना जमीनविषयक विविध प्रश्न व शंका विचारल्या, यावर कृषीकन्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. व शेतावर जाऊन माती परिक्षणाचे नमूने कसे गोळा करायचे याचे प्रात्यक्षिक दाखवले. कृषीकन्या दिपाली डोळस, दिपाली डामसे, समृध्दी वैरागर आणि निकिता बिक्कड यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांना महाविद्यालयाच्या प्राचार्या मोडक, प्रा. नवलकर यांनी मार्गदर्शन केले.



● खरपुडी बुद्रुक (ता. खेड) येथे शेतकऱ्यांना ग्रामीण (कृषि) जागरुकता आणि कृषि औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत माती परिक्षणाचे प्रात्याक्षिक कृषीकन्यांनी दाखविले. (छायाचित्र : किरण खुडे , राजगुरूनगर) ●

# डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या १२०० विद्यार्थ्यांकडून योगाचा विश्वविक्रम स्थापित

## संगीताच्या सूरबद्ध लयीवर विद्यार्थ्यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील नावाजलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या १२०० विद्यार्थ्यांनी शनिवार दि. १८ जानेवारी रोजी सुमधूर संगीताच्या तालावर एकाहून एक चित्तथरारक प्रात्यक्षिके करीत योगाचा अनोखा विश्वविक्रम प्रस्थापित केला आणि इंडिया वर्ल्ड बुकमध्ये आपले नाव नोंदवले. या वेळी विद्यार्थ्यांनी आपली उच्च कोटीची कलाकौशल्ये सादर करीत अवघ्या १५० मिनिटांमध्ये



प्राचीन ते आधुनिक प्रकारच्या ३० योगाची प्रत्यक्षिके सादर करीत उपस्थितांची अक्षरशः मने जिंकून घेतली. या कार्यक्रमात पालकांच्या लयबद्ध ढोलताशा वादनाने आणखी उत्साह भरण्याचे काम केले, तसेच हजारो उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करीत जोरदार जल्लोष केला.

कार्यक्रमाला डी. ई. एस. च्या नियामक मंडळ आणि परिषदेचे अध्यक्ष प्रमोद रावत, उपाध्यक्ष ॲड. अशोक पलांडे, कार्यवाह डॉ. आनंद काटिकर, डॉ. शरद कुंटे, प्रा. धनंजय कुलकर्णी, शाळा समिती अध्यक्षा ॲड. राजश्री ठकार, मुख्याध्यापिका अर्चना धनावडे, या विश्वविक्रम उपक्रमाचे सल्लागार डॉ. मिलिंद संपगावकर, खेमराज रणपिसे, डॉ. पल्लवी गव्हाणे, डॉ. सोपान कांगणे, विकी बारावरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रीडा शिक्षिका योगिनी कानडे, सिमरन गुजर, ग्रेसी डिसूझा यांनी या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांची जोरदार तयारी करवून घेत विश्वविक्रमात आपला मोठा हातभार लावला.

शनिवारी सायंकाळी दीपप्रज्वलन आणि कर्णमधूर अशा शंखनादाने या योगा विश्वविक्रमाच्या कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक आणि आधुनिक पोषाखांमध्ये येऊन विविध प्रकारे योगासने उपस्थितांसमोर प्रस्तुत केली.

भक्तगीत, भावगीत, चित्रपट गीत-संगीताच्या लयबद्ध चालीवर विद्यार्थ्यांनी आपली गुणकौशल्ये सादर केली. योगा विश्वविक्रमात विद्यार्थ्यांनी काल योग, सूर्यनमस्कार, चंद्रनमस्कार, ट्रायबल योगा, ॲनिमल योगा, बर्ड पोजेस, दंड योग, पार्टनर योगा, रिव्होल्यूशनरी पोजेस, तालीयोग, व्हिदमिक योगा, इक्विमेंट योगा, थेरा बँड योग, ब्रिक्स योग, चेअर योगा, मेडिसनल बॉल योगा, योगा फॉर स्पोर्ट्स, डान्स योगा, पॅट्रियॉटिक मंडल योग, ॲक्वा योगा, स्पिरिच्युअल योगा आणि पावर योगाची प्रात्यक्षिके सादर केली.

विद्यार्थ्यांनी शिक्षक व तज्ज्ञांच्या कुशल मार्गदर्शनात अंडरवॉटर योगा तसेच स्केटिंग योगा केले होते, त्याची व्हिडिओ क्लिप या वेळी दाखवण्यात आली.

# थोडक्यात




## प्रा. सचिन माथेफोड यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : दि.१९ रोजी उरुळी कांचन येथे अखिल भारतीय राज्य मराठी परिषद व पोलीस मित्र संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्य स्तरीय काव्य संमेलन आयोजित करण्यात आले होते.यामध्ये सामाजिक,शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.आळंदी म्हातोबा येथील शिक्षक प्रा सचिन माथेफोड यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. ऊसतोड कामगार यांच्या मुलांसाठी तसेच पालावरील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या शिक्षणासाठी माथेफोड सर काम करत असतात.शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यात त्यांचे मोठे योगदान आहे.यावेळी राज्य भरातून कवी व साहित्यिक एकत्र आले होते.यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे,प्रा सुरेश वाळेकर,संमेलन अध्यक्ष सूर्यकांत नामुगडे,साहित्य परिषद राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे,क्रीडा अधिकारी माणिक देवकर,मा. जि. प सदस्य महादेव कांचन आदी मान्यवर उपस्थित होते.

## महिलांपाठोपाठ भारताचा पुरुष संघही ठरला पहिला वर्ल्ड चॅम्पियन!

मुंबई (आरंभ पर्व) : रविवारी भारतीय महिला संघाने पहिल्या वहिल्या खो-खो वर्ल्ड कप स्पर्धेत विजेतेपद पटकावले. भारतीय महिलांच्या पोठापाठ रविवारी भारताच्या पुरुष संघानेही खो-खो वर्ल्ड कपवर नाव कोरले. अंतिम सामन्यात भारतीय पुरुष संघाने ५४-३६ गुणांच्या फरकाने विजय मिळवला. भारताने अंतिम सामन्यात एकतर्फी विजय मिळवला. भारताने नेपाळला या स्पर्धेत दुसऱ्यांदा पराभूत केले. साखळी फेरीतही भारताने नेपाळवर विजय मिळवला होता. या सामन्यात भारताने चारही टर्नमध्ये वर्चस्व गाजवले. भारताने सुरवातीपासूनच आक्रमक खेळ करताना नेपाळला पुनरागमनाची संधी दिली नाही.

## थोडक्यात

### नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रीपदाला स्थगिती !

नाशिक (आरंभ पर्व) : दीड महिन्यापासून पालकमंत्रीपदाची रखडलेली यादी काल शनिवारी 18 जानेवारी रोजी राज्य शासनाने जाहिर केली. पण महायुतीच्या घटकपक्षांमध्ये यावरुन धुसपूस सुरु होती. त्याचाच परिणाम म्हणजे आज नाशिक व रायगड या जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाला राज्य शासनाने स्थगिती दिली आहे. यावरुन पालकमंत्री पदावरून महायुतीतील वाद चव्हाट्यावर आला आहे. नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्रीपद हे गिरीश महाजन यांच्याकडे दिले होते. तर रायगडच्या पालकमंत्रीपदी आदिती तटकरे यांची दुसऱ्यांदा वण लागली होती पण आज या दोन्ही जिल्ह्यातील पालकमंत्रीपदांना महाराष्ट्र शासनाने स्थगिती दिली आहे. नाशिक चे पालकमंत्रीपद हे मुळचे जळगावचे असलले गिरीश महाजन यांना दिले होते. तर रायगडवर शिवसेनेचे भरतशेठ गोगावले यांनी दावा केला होता. पण याठिकाणी राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या आदिती तटकरे यांनी बाजी मारली होती पण आता या दोन्ही पालकमंत्रीपदांना राज्य शासनाने स्थगिती दिली आहे.

### राष्ट्रीय तालीमच्या वतीने शहर निवड चाचणी कुस्ती स्पर्धेचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : 67 व्या राज्य अजिंक्यपद गादी व माती गट कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब कुस्ती स्पर्धेसाठी राष्ट्रीय तालीम संघाच्या वतीने शहर निवड चाचणी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रीय तालीम संघाचे सरचिटणीस शिवाजीराव बुचडे यांनी दिली. राष्ट्रीय तालीम संघाची निवड चाचणी कुस्ती स्पर्धा शनिवार दि. 25 जानेवारी रोजी मंगळवार पेठ येथील छत्रपती शिवाजी स्टेडियम येथे सकाळी 9 ते 11 यावेळेत कुस्तीगीरांची वजने होतील आणि सांय 4 वाजता कुस्ती स्पर्धस प्रारंभ होईल. तरी पुणे शहरातील सर्व पैलवान, वस्ताद, कुस्ती शौकीन यांनी उपस्थित राहावे. गादी आणि माती गटात 57 कि., 61 कि., 65 कि., 70 कि., 74 कि., 79 कि., 86 कि., 93 कि., 97 कि. आणि 86 ते 125 की महाराष्ट्र केसरी गटासाठी वजनगट असणार आहे. या कुस्ती निवड चाचणीमध्ये कुस्तीगीर ज्या शहर किंवा जिल्हा संघातून सहभागी होणार आहे. तेथील रहिवासी असणे बंधनकारक आहे, कुस्तीगीरांची जन्म तारीख 2004 व त्या पुर्वीची असावी तसेच सन 2005 व 2006 मध्ये जन्मलेल्या कुस्तीगीरास मेडिकल सर्टिफिकेट व पालकांचे संमतीपत्र असेल तर सहभागी होता येणार आहे. वयाचा व रहिवासी पुरावा म्हणून ओरिजनल आधार कार्ड अथवा पासपोर्ट ग्राह्य धरण्यात येईल, रेल्वे व आर्मी (सर्व्हिसेस) मध्ये नोकरीस असलेल्या कुस्तीगीरास या स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार नाही. ग्रिकोरोमण राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील पदक विजेत्या कुस्तीगीरास या स्पर्धेमध्ये सहभाग घेता येणार नाही. स्पर्धेसाठी 1 किलो सुट देण्यात येणार असून स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी ज्ञानेश्वर मांगडे आणि रोहिदास आमले यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन शिवाजीराव बुचडे यांनी केले आहे.

### राष्ट्रीय स्पर्धा पुन्हा पुण्यात घेण्याचा प्रयत्न करणार : मुरलीधर मोहोळ

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रात आणि पुण्यामध्ये पुन्हा एकदा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन व्हायला हवे आणि त्यासाठी आपण प्रयत्न करू, असे प्रतिपादन केंद्रीय सहकारी राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले. म्हाळुंगे-बालेवाडी येथील छत्रपती क्रीडा संकुल येथे आयोजित सब ज्युनिअर राष्ट्रीय स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उद्योजक पुनीत बालन, इन्स्पायर इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्सचे तथागत मुखर्जी, ज्यूदो फेडरेशनचे पदाधिकारी वीरेंद्र वशिष्ठ, सी एस राजन यांसह द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त जीवन शर्मा, अर्जुन पुरस्कार प्राप्त यशपाल सोलंकी, राज्य ज्यूदो संघटनेचे अध्यक्ष धनंजय भोसले, महासचिव शैलेश टिळक आणि तांत्रिक सचिव दत्ता आफळ यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. मोहोळ म्हणाले, ज्यूदो हा खेळ माझ्या आवडत्या कुस्ती खेळाशी खूप साम्य आहे. यातील डावही कुस्तीमध्ये वापरले जातात. त्यामुळे ज्यूदो आणि कुस्ती हे युद्धकलेचे खेळ, भाऊ-भाऊच आहेत. यावेळी पुनीत बालन यांनी स्पर्धेतील सहभागी पदक विजेत्यांसाठी रोख दहा लाख रुपयांची बक्षिसांची घोषणा केली. यामध्ये सुवर्णपदक विजेत्यास 11 हजार रुपये, रौप्य पदक विजेत्यास 7 हजार रुपये तर दोन्ही कांस्यपदक विजेत्यास पाच हजार प्रत्येकी असे पारितोषिक जाहिर केले. पॅरिस येथील ऑलिम्पिक स्पर्धेत रौप्य पदक विजेता अर्जुन पुरस्कार प्राप्त सचिन खिलारे यांना विशेष आमंत्रित केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य ज्यूदो संघटनेचे महासचिव शैलेश टिळक यांनी तर आभार प्रदर्शन तांत्रिक सचिव दत्ता आफळे यांनी केले. स्पर्धेसाठी सबज्युनियर गटामध्ये 29 राज्यातील 235 मुले आणि 230 मुली खेळाडू सहभागी झाले आहेत.

### शेणखताला आला सोन्याचा भाव

टाकळी भीमा (आरंभ पर्व) : शेती वाचवण्यासाठी, शेतजमिनीचा पोत सुधारण्यासाठी शेणखताचा वापर महत्त्वाचा असून, शेतकरी मिळेल त्या किमतीला शेणखत विकत घेऊ लागले आहेत. शिरूर तालुक्यातील विविध गावांतील शेतकऱ्यांकडून शेणखताला मागणी वाढली आहे. जनावरांना लागणारी वैरण, सुग्रास, पेंड आणि औषधे, मजुरीचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामानाने दुधाचे दर वाढत नाहीत. दूध धंदा परवडत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी जनावरे पाळणे कमी केले. आता तर गाई, म्हशीचे दर गगनाला भिडले आहेत. परिणामी गाई, म्हशींपासून मिळणारे शेणखत बंद झाले. याचा फटका शेतीला बसला आहे. शेतकऱ्यांना शेणखताचे महत्त्व लक्षात आले असून पुन्हा मिळेल तिथून आणि मिळेल त्या किमतीत शेणखत विकत घेऊन ते शेतात टाकले जात आहे. एक ट्रक शेणखत शेतात पांगविण्यासाठी मजुरांना 2 हजार रुपये, शेणखताची किंमत 7 हजार रुपये, शेणखत ट्रॅक्टर भरण्यासाठी 1500 रुपये मजुरी, असा 10 हजार 500 रुपये खर्च होतो. खताचा ट्रेलर 10 हजाराला विक्री होतो, तर शेणखताचा ट्रक 17 ते 18 हजार रुपयांना मिळतो, अशी माहिती टाकळी भीमा येथील ट्रॅक्टर मालक योगेश काळे, राम पाटोळे यांनी दिली. या खताला ऊस उत्पादक शेतकरी, द्राक्ष बागायतदार व भाजीपाला पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांकडून मागणी वाढत आहे. बांधावर टाकलेले खत शेतात पसरवण्यासाठी मजुरांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

# पक्षी अभ्यासकांकडून सर्वेक्षण आणि पक्षी गणना

**पैठण (दै. आरंभ पर्व)**

जायकवाडी पक्षी अभयारण्य येथे रविवारी (ता. १९) आशियायी पाणपक्षी गणना आज करण्यात आली. ३५ हजार हेक्टर वर असलेल्या या अभयारण्यात सुमारे २८ ठिकाणी एकाच वेळी सकाळी सहा ते अकरा वाजेपर्यंत ही गणना झाली. त्यात पक्षांच्या शेकडो प्रजाती आढळुन आल्या. फ्लेमिंगो हा पक्षी शेकडो च्या थव्याने टाकळी, रामडोव्ह, मावसगव्हान परिसरात आढळला जायकवाडी पक्षी अभयारण्यातील जैविक विविधता, स्थलांतरित पक्षांची संख्या गणना करण्यासाठी विभागीय वन अधिकारी राहुल सपकाळ यांनी दहा पथके तयार केली होती.

यात बॉम्बे नेचरल हिस्ट्री सोसायटी (बीएचएनएस) व पैठण व छत्रपती संभाजीनगर येथील पक्षीमित्र, पक्षी अभ्यासक, सहभागी झाले होते. यामध्ये सोनवाडी, जायकवाडी अभयारण्यातील टाकळी, लांबगव्हाण, दहेगाव, विजापुर, वरखेड, कारखाना टोका, मावसगव्हण, रामडोव्ह, बोट हाऊस, जायकवाडी दक्षिण पंप हाऊस आदी ठिकाणाचा समावेश होता. यात प्रामुख्याने स्थानिक व स्थलांतरित पक्षी फ्लेमिंगो ,कॉमन कूट (वारकरी) स्पॉट बिल (हळदी कुंकू), पोचार्ड, कार्मोरंट, सिगल, व्हिस्पर टर्न, रिव्हर टर्न, रेड कॅपेड आयबीस, ग्लॉसी आयबीस, ब्लॅक हेडेड आयबीस, ब्राम्ही डक, किंग फिशर, रॉबिन, ब्लॅक विंग स्टील्ट, येलो वेगटेल, आदी पक्षी पाणथळ जागेवर व जायकवाडीच्या अथांग पाणपसऱ्या वर हे पक्षी मोठ्या प्रमाणात आढळले. या पक्षी गणनेसाठी विभागीय वन अधिकारी राहुल सपकाळ, वनपाल, अनिता जाधव, रूपाली सोळसे, श्रीमती शेख, संदीप कराळे, राहुल तरवडे, सोमिनाथ बुधवंत, यांचे सह पैठण येथील पोलिस निरीक्षक संजय देशमुख, प्रा. संतोष गव्हाणे, दिलीप भगत, सुनील पायघन, बजरंग काळे, सुनील डिंगरे, अर्जुन कुचे यांच्यासह मानद वनपाल डॉ. किशोर पाठक बीएचएनएस चे मोहीजीत पोदार, अभिनव नायर, कुणाल विभांडिक, किरण परदेशी, राहुल मराठे, प्रमिला मोरे, श्रवण परळीकर, आदीनी सहभाग नोंदवला.



### रिंग लावलेले पक्षी ही आढळले!

**दरम्यान, या पक्षी गणनेत विंग स्टिल्ट हा पक्षी व रफ, ब्लॅक टेल गॉडविट, ग्रेटर थीकणी हे रशिया युरेशिया, मंगोलिया येथील स्थलांतरीत पक्षी मोहीजीत पोद्दार, वनाधिकारी राहुल सपकाळ यांचे पथकास आढळून आले. या पक्षांना दोन वर्षापूर्वी टॅग (रींग) लावलेला होते ते पक्षी ही आजच्या पक्षी गणणेत आढळुन आले असल्याचे पक्षी अभ्यासक प्रा. संतोष गव्हाणे यांनी सांगितले.**

## रागाच्या भरात प्रवाशाचं संतापजनक कृत्य



**जळगाव (दै. आरंभ पर्व)**

बस थांबा नसलेल्या ठिकाणी एसटी बस थांबवण्यास सांगितले परंतु ड्रायव्हरने बस थांबवले नाही याचा राग येऊन जामनेर येथील शेख बुरहान व त्याच्या साथीदाराने बस ड्रायव्हर व कंडक्टर यांना मारहाण करून शिवीगाळ केले याबाबत जामनेर पोलीस स्टेशनला शेख बुरहान याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की काल सायंकाळी साडेचार वाजता मुक्ताईनगर आगारातून एम एच 20 बी एल 1401 ही बस जामनेर कडे निघाली. बोदवड वरून काही प्रवासी या बस मध्ये बसले. शेख बुरहान हा प्रवासी पण जामनेरला येण्यासाठी याच गाडीत बसला. बस जामनेरला येताच गोविंद चौफुलीवर बस थांबवण्याचा आग्रह शेख बुरहाण याने धरला.

मात्र या ठिकाणी बस थांबा नाही. म्हणून चालक विजय शिवाजी पाटील याने पुढे येऊन बस थांब्यावर बस थांबवली. याचा राग येऊन शेख बुरहान याने चालकास शिविगाळ केली. दोघात बाचाबाची झाली.

चालकाने पुढे बस पोलीस स्टेशनला आणल्यावर त्यांच्या आधीच बुरहान व त्याचे साथीदार हजर होते त्यांनी त्याच ठिकाणी कंडक्टर वर ड्रायव्हर यांना लाथा मुक्याने मारहाण करून पुन्हा शिविगाळ केली याबाबत ड्रायव्हर यांनी जामनेर पोलीस स्टेशनला गुन्ह्याची नोंद केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक कासार करीत आहे.

## १२.५० लाख शेतकऱ्यांसाठी खुशखबर !

### २५ जानेवारीनंतर केंद्र सरकारचा सन्मान निधी तर फेब्रुवारीत राज्य सरकारकडून नमो शेतकरी महासन्मान योजनेचा हप्ता

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधीचा लाभ २५ जानेवारीनंतर शेतकऱ्यांना मिळणार आहे. पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची माहिती १९ जानेवारीपर्यंत मागविण्यात आली आहे. केंद्राचा १९ वा हप्ता मिळाल्यानंतर फेब्रुवारीत राज्य सरकारच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा हप्ता वितरीत होईल, असे कृषी विभागाकडून सांगण्यात आले. सोलापूर जिल्ह्यातील पाच लाख लाभर्थीसह राज्यातील १२ लाख ५० हजार शेतकऱ्यांना हा लाभ मिळणार आहे. त्यात १९ लाखांहून अधिक महिला शेतकरी आहेत.

सोलापूर जिल्ह्यात करमाळा तालुक्यातील ६२ हजार ६१५, पंढरपूर तालुक्यातील ६० हजार १४, सांगोल्यातील ५७ हजार ७००, माळशिरस तालुक्यातील ५६ हजार ३५५ आणि माढा तालुक्यातील ५३ हजार ८७९ शेतकरी प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेचे लाभार्थी आहेत. याशिवाय अक्कलकोट व बार्शी तालुक्यातील एक लाख, मंगळवेढा व मोहोळ तालुक्यातील ७९ हजार, दक्षिण सोलापुरातील ३५ हजार ६७४ आणि उत्तर सोलापुरातील १४ हजार ७९९ शेतकऱ्यांनाही केंद्राच्या सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता मिळणार आहे. दरम्यान, केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांना सन्मान निधी वितरीत झाल्यावर त्या लाभार्थींना काही दिवसांनी राज्याच्या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना दिला जातो.

केंद्र सरकारची प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजना व राज्य सरकारच्या नमो शेतकरी सन्मान निधी योजनेतून प्रत्येकी सहा हजार रुपये (प्रत्येक ३ महिन्याला दोन हजार रुपये) मिळतात. मात्र, जिल्ह्यातील चार हजार ३६६ शेतकऱ्यांनी अजूनपर्यंत ई-केवासयी केली नसल्याने त्यांना दोन्ही योजनांचा लाभ मिळालेला नाही. त्यात पंढरपूर (९२८), सांगोला (५४८) व दक्षिण सोलापूर (४२२) तालुक्यातील एकूण दोन हजारांवर शेतकरी आहेत.



### ‘ॲग्री स्टॅक’ ॲपवरुन मिळणार वस्तुनिष्ठ माहिती

**शेतकऱ्यांना त्यांच्या स्वत:च्या मोबाईलवरुन किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून पीक कर्जाच्या मागणीचा अर्ज भरता यावा, शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांची व सवलतीची माहिती एकाच ॲपवरुन मिळावी, या उद्देशाने ‘ॲग्री स्टॅक’ ॲप तयार केले आहे. प्रत्येक शेतकऱ्याची रियल टाईम माहिती अधिकाऱ्यांना लगचेच मिळणार आहे. शेती विकल्यावरही अनेकजण सन्मान निधी योजनेचा लाभ घेत आहेत, पण त्याची माहिती चार-सहा महिन्यानंतर समजते. आता हा प्रकार ॲपमुळे बंद होणार आहे.**

## नाक-तोंड दाबून मुलीचा खून; आईला जन्मठेप

### आईनेही केला होता आत्महत्येचा प्रयत्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लग्नाच्या नैराश्येतून स्वतःच्या मुलीचा शालीने नाक-तोंड दाबून खून करणाऱ्या अनिता सावळे (वय 25, रा. वारजे) हिला न्यायालयाने जन्मठेप आणि दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी हा निकाल दिला. अनिता लग्नाला वैतागली होती.

नवरा बोलत नसल्याने तिने आत्महत्येचा प्रयत्न करत लग्नाच्या नैराश्येतून हे कृत्य केल्याचे पोलीस तपासात समोर आले होते. याप्रकरणी तिच्याविरोधात वारजे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

4 फेब्रुवारी 2016 रोजी ही घटना घडली. पती कामावर गेले असताना अनिता हिने घरात मुलीचा शालीने नाक-तोंड दाबून खून केला. त्यानंतर छताच्या पंख्याला साडीने गळफास घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. या घटनेने पुणे जिल्ह्यात खळबळ उडाली होती.

वारजे पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास करून आरोपी महिलेला अटक करत आरोपपत्र दाखल केले. कौटुंबिक वादातून पती दोन दिवसांपासून बोलत नव्हता, तसेच सासूही प्रतिसाद देत नव्हती, असा कबुली जबाब आरोपीने दिला होता. खटल्यात अतिरिक्त सरकारी वकील मिलिंद दातरंगे यांनी काम पाहिले. त्यांनी सरकार पक्षातर्फे 20 साक्षीदार तपासले.

माझ्यामागे बाळाची फरफट होऊ नये, म्हणून तिला सोबत नेत आहे, अशी चिठ्ठी तिने लिहिली होती.

**तक्रारदारांतर्फे ॲड. ए. व्ही. औसेकर यांनी बाजू मांडली, तर बचाव पक्षातर्फे ॲड. सचिन झालटे पाटील यांनी युक्तिवाद केला. छळ आणि नैराश्येतून आईने मुलीचा खून केल्याची ही घटना दुर्मीळ असून, आरोपीची पार्श्वभूमी गुन्हेगारीची नसल्याने तिला कमीत कमी शिक्षा ठोठावण्यात यावी, असा युक्तिवाद बचाव पक्षाने केला. दोन्ही बाजू ऐकून घेतल्यावर न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.**

लग्नाच्या नैराश्येतून तिने हे पाऊल उचलल्याने गुन्ह्यामागचा हेतू सिद्ध झाल्याचे सरकार पक्षाने सिद्ध केले. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे निष्पाप बालिकेचा जीव गमावला असून, तिला जास्तीत जास्त कठोर शिक्षा ठोठावण्यात यावी, असा युक्तिवाद सरकार पक्षाने केला.

## नारायणगाव अपघातातील ट्रक, एसटी चालक अटकेत

**नारायणगाव (दै. आरंभ पर्व)**

पुणे-नाशिक महामार्गावरील नारायणगाव येथे शुक्रवारी (दि. 18) सकाळी झालेल्या अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी आयशर मालट्रकचालक रोहित कुमार जगमालसिंग चौधरी (वय 30) व नाशिक-महाबळेश्वर या एसटीचे बसचालक भाऊसाहेब भास्कर जायभाई (वय 40) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना अटक करण्यात आली आहे.

या दोघांना शनिवारी (दि. 19) जुन्नर न्यायालयात हजर केले असता मालट्रकचालक रोहित कुमार जगमालसिंग याला तीन दिवसांची पोलिस कोठडी, तर एसटी बसचालक भाऊसाहेब जायभाई याला न्यायालयीन कोठडी दिली असून, त्यांची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली आहे. दरम्यान, अपघातातील दोन गंभीर

**● दोन जखमींची प्रकृती गंभीर**

जखमींची प्रकृती चिंताजनक असून, इतर जखमींच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे, अशी माहिती सहायक पोलिस निरीक्षक शेलार यांनी दिली.

पुणे-नाशिक महामार्गावर येथील मुक्ताई ढाब्याजवळ प्रवासी वाहतूक करणारी मॅक्झिमो व्हॅन, मालवाहतूक आयशर टेम्पो व एसटी बस या तीन वाहनांमध्ये शुक्रवारी सकाळी भीषण अपघात झाला होता. या अपघातात मॅक्झिमो व्हॅनच्या चालकासह नऊ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. आठ प्रवासी जखमी झाले होते. यापैकी तस्लीम वसीम इनामदार (वय 30) आणि गणपत बजाबा घाडगे (वय 52 ) यांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांच्यावर नारायणगाव येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# मंत्रिमहोदयांच्या अटीची पूर्तता ‘जायका’ नंतरच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पाण्याचा वाढीव कोटा मिळण्यासाठी 40 टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याच्या जलसंपदामंत्र्यांनी घातलेल्या अटीची पूर्तता जायका प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरच करणे शक्य होणार आहे. त्यामुळे पुणेकरांच्या पाण्याचा वाढीव कोटा जायका पूर्ण झाल्यानंतर जून महिन्यानंतरच मंजूर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जलसंपदा विभागाने पुणे शहरासाठी 14 टीएमसी पाणी कोटा मंजूर केला आहे. मात्र, महापालिका 21 टीएमसी पाणी उचलते. महापालिकेची वाढती हद्द आणि लोकसंख्येमुळे महापालिकेकडून पाण्याचा कोटा आणखी वाढविण्याची मागणी केली जात आहे.



या पार्श्वभूमीवर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाण्याची गरज भागविण्यासाठी पुणे महापालिकेने 30 ते 40 टक्के पाण्याचा पुनर्वापर करावा, धरणांमधील पाण्याचे आरक्षण बिगरसिंचनासाठी वाढविण्यास लागणारा भुर्दंड सोसावा. या अटींच्या पूर्ततेशिवाय पुण्याला अतिरिक्त पाणी वाढून देता येणार नाही, अशी स्पष्ट भूमिका घेतली आहे.

इतकेच नाही, तर मंजूर कोट्यापेक्षा जास्त पाणी उचलत असल्याने महापालिकेला नोटीस बजाविण्याचे आदेश जलसंपदाच्या अधिकाऱ्यांना दिल्याचे त्यांनी स्वतः माध्यमांना सांगितले. दरम्यान, शहरात दररोज 1750 एमएलडी पाण्याचा वापर होतो. त्यातील 1400 एमएलडी मैलामिश्रित पाणी निर्माण होते. या पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेने शहरात विविध ठिकाणी 9 मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) बांधले आहेत. या एसटीपी प्रकल्पामध्ये दररोज 367 एमएलडी पाण्यावर प्रक्रिया केली जाते. हे पाणी प्रक्रिया करून नदीत सोडले जाते, तर उर्वरित मैलामिश्रित पाणी थेट नदीत मिसळते.

### जायकामध्ये समाविष्ट गावांचा समावेश नाही

**नदीसुधार प्रकल्पामध्ये महापालिका हद्दीत समावेश झालेल्या 34 गावांमधील अंदाजे 550 ते 600 एमएलडी मैलामिश्रित पाणी ओढे, नाल्यांमधून नदीतच मिसळते. समाविष्ट 11 गावांपैकी केवळ केशवनगर येथे 12 एमएलडी क्षमतेच्या एसटीपी प्रकल्पाचे काम सुरू आहे. समाविष्ट 23 गावांसाठी अद्याप काहीच नाही. त्यामुळे नदीसुधार प्रकल्प पूर्ण केल्यानंतरही मुळा-मुठा नदी स्वच्छ दिसणार नाही.**

### मुंढवा जॅकवेलचे पाणी उचलण्यास जलसंपदा उदासीन

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासोबत केलेल्या करारानुसार महापालिकेने मुंढवा येथे जॅकवेल बांधून या ठिकाणी 515 एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया प्रकल्प उभारला आहे. नदीपात्रातून उचललेल्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते मुंढवा येथून बेबी कॅनॉलच्या माध्यमातून पुढील भागासाठी शेतीसाठी उपलब्ध करून देण्यात येते. या प्रकल्पाची क्षमता 515 एमएलडी असताना जलसंपदाकडून मात्र रोज 300 एमएलडीच पाणी उचलले जाते.**




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.